# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/01/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रेझिंग डे सप्ताह उत्साहात साजरा

०२ जानेवारी हा दिवस संपुर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्या निमीत्ताने नागपूर ग्रामीण हद्दीतील अनेक शाळा, कॉलेजांमध्ये नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे 'रेझिंग डे' सप्ताह विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत असुन या दरम्यान नागपूर ग्रामीण येथील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस रेझिंग डे दिनानिमित्य विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविले. यामध्ये पो.स्टे. सावनेर अंतर्गत राम गणेश गडकरी महाविद्यालय सावनेर येथे दिनांक ०५/०१/२०२४ रोजी ११.०० वा. ते १२.०० वाजता दरम्यान श्री. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक यांनी विद्यार्थी विद्यार्थिनींना पोलीस रेझिंग दिनानिमित्य सायबर विषयी जनजागृती करण्याकरिता मार्गदर्शन केले तसेच आठवडी बाजार भिवापुर येथे पोलीस रेझिंग डे निमित्याने आठवडी बाजारात खरेदी करण्याकरीता येणाऱ्या नागरीकांना वाहन चोरी व मोबाईल चोरीच्या वाढत्या घटनासंबंधी माहिती देवुन बाजारात वाहने पार्कींग करतेवेळी घ्यावयाची काळजी तसेच मोबाईल चोरीच्या घटनांवर कसा प्रतिबंध करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. पोलिस ठाणे काटोल अंतर्गत रेझींग डे सप्ताह निमित्त बनारसी दास रुईया हायस्कूल काटोल येथे सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे यांनी विद्यार्थ्यांना महिला अत्याचार, बाल लैंगिक अत्याचार व सायबर क्राईम तसेच वाहतूक नियमाबाबत व ईतर विषयावर मार्गदर्शन केले. पो.स्टे. कळमेश्वर येथे नगरपरिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कळमेश्वर येथील विद्यार्थी/विद्यार्थीनिंना पोलीस प्रशासन कसे काम करतो याबाबत माहिती देवून पोलीस वाहतूक अंमलदार यांनी वाहतुकीचे नियम याबाबत माहिती देऊन अपघात वेळी काय काळजी घेतली पाहिजे तसेच इतर तात्काळ मदतीसाठी डायल ११२ वर कॉल करून कशी मदत मिळते त्याबाबत माहिती देण्यात आली.







## मोटारपंप चोरी

**पोस्टे रामटेक :–** अंतर्गत चारगाव शिवार ता. रामटेक येथे दिनांक ०४/०१/२०२४ चे ०२.०० वा. ते ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय कृष्णराव मारगमवार, वय ५४ वर्ष, रा. शितलवाडी हा आपल्या शेतात पिकाला लावलेले पाणी पाहण्याकरीता गेला असता त्यास शेतामध्ये बोअरवेलला लावलेला लोखंडी कठडा तुटलेला दिसला व त्यामधील ०१ एच पी ची ईलेक्ट्रीक मोटार किंमती १००००/– रू ०२) लोखंडी पॅनल किंमती २०००/– रू ०३) मोटारचा केबल किंमती ३०००/– रू. एकुण १५०००/– रू. चा मुद्देमाल चोरीस गेल्याचे दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार पायक यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक उंदीरवाडे मो. नं. ९८३४१२७३६५ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. रामटेक :–** पो.स्टे. रामटेक हद्दीत दिनांक ०५/०१/२०२४ चे ०५.०० वा. ते ०५.३० वा. दरम्यान फिर्यादि हा घरी आला असता त्याला त्याची लहान मुलगी हिने सांगितले की मोठी मुलगी ही घरी नाही त्यावरून फिर्यादिने त्याची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०४ महीने हीचा गावात शोध घेतला असता फिर्यादिला त्याच्या गावात राहणारा धनराज शिवरकर याने सांगीतले की, बादल रविंद्र देशमुख, वय २२ वर्ष रा. बनपुरी ता. पारशिवनी याने फिर्यादिची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०४ महीने हिला मोटार सायकलवर बसुन निघुन गेले आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे यांनी भेट दिली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे मो. क्र. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**